अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मानवी हक्क

सध्यांच्या युद्धांत रशियन आरमारांतील अधिकाराच्या जागेवर असलेल्या लेव्ह उस्पेन्स्की नामक सोव्हिअेट लेखकाने लिहिलेल्या पत्राला उत्तर देतांना जगप्रसिद्ध लेखक अेच्. जी. वेल्स् यांनी मानवी हक्कांची रूपरेषा पुढीलप्रमाणें दिली आहे. ( जून १९४२ ).

## मनुष्याचे वैयक्तिक हक्क आणि सामाजिक कर्तव्यें

पुढील मसुदा जगांतील कित्येक कायदेपंडित आणि तज्ञ लेखक यांच्या समितीने खल करून ठरवलेला आहे आणि सर्व राष्ट्रांच्या संमतीने सर्व जगभर स्वातंत्र्य आणि समता हीं तत्वें कशीं लागू करतां येतील हें यांत सांगितलें आहे.

**१ जगण्याचा हक्क.** या मसुद्यांत मनुष्य याचा अर्थ कोणताही मनुष्य जातीचा प्राणी असा आहे, त्यांत लिंगभेद नाही, वयाची मर्यादा नाही.

मनुष्यजातीने आजपर्यंत मिळवलेलें ज्ञान, शास्त्रीय शोध व कोणत्याही प्रकारची शक्ति, यांवर प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे. या ज्ञानाने शक्य होअील तितक्या मर्यादेंत त्याला जन्मापासून मरेपर्यंत आपल्या शरीराचा आणि मनाचा पूर्ण विकास होण्यास जरूर तितकें अन्नवस्त्र आणि वैद्यकीय मदत मिळण्याचा हक्क आहे, आणि यांत जातिभेद, वर्णभेद, धर्मभेद किंवा मतभेद आड येतां नये. व्यक्तींमधें आणि त्यांच्या गुणांमधें कितीही असमता असो, कायद्याच्या दृष्टीने सर्व माणसें समान मानलीं जातील, सामाजिक जीवनांत त्यांना सारखेंच स्थान मिळेल, आणि मानही सारखाच मिळेल.

**२ अज्ञानांचें संरक्षण.** अज्ञान मुलांचे नैसर्गिक पालक त्यांचे आअी-बाप होत. त्यांचे अभावीं समाजाने त्यांच्या कौटुंबिक परंपरेचा पूर्ण विचार

करून दुसरे योग्य पालक स्वीकारावे किंवा नेमावे.

**३ सामाजिक कर्तव्य**. प्रत्येक मनुष्याने जगांतील अितर सर्व माणसांचे हक्क मानले पाहिजेत, अितकेंच नव्हे तर अशा हक्कांना आपला पाठिंबा दिला पाहिजे आणि ते मिळवण्यास मदत केली पाहिजे. शिवाय पूर्ण स्वातंत्र्य दिल्याने जीं जरूरीचीं सामाजिक कामें करण्यास पुरेसे लोक पुढें येणार नाहीत, तीं करण्यास त्याने मदत केली पाहिजे. अशा रीतीने कामाचा वांटा उचलल्यासच त्याला समाजाचा घटक म्हणवण्याचा हक्क राहील. युद्धाकरतां, किंवा ज्याला तात्विक विरोध असेल अशा कोणत्याही कामाकरतां, कोणावरही सक्ती होतां नये. पण जो समाजाचें कोणतेंही काम करण्यास तयार नाही, त्याला मतदानाचा हक्क मिळणार नाही, आणि तो अज्ञान समजला जाअील.

**४ ज्ञानाचा हक्क**. सर्वांना ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें आणि सर्वांत जास्त उपयुक्त काम करतां येअील अशा रीतीचें शिक्षण देणें समाजाचें कर्तव्य आहे. शिवाय कोणत्याही प्रकारचें ज्ञान सर्वांना उपलब्ध असलें पाहिजे आणि कोणाच्याही अंगीं कांहीं विशेष गुण असल्यास त्याचा पूर्ण विकास होऊन मनुष्यजातीची सेवा करण्यास तो अधिक लायक होअील अशा विशेष शिक्षणाची संधि सर्वांस मिळाली पाहिजे. चालू परिस्थितीवर आणि प्रश्नांवर आपलें मत बनवण्यास उपयुक्त अशी सर्व माहिती सर्वांस ताबडतोब आणि सुलभ रीतीनें मिळाली पाहिजे.

**५ विचारस्वातंत्र्य**. विचार प्रकट करण्याचें, वादविवाद करण्याचें, संघटनेचें आणि धर्माचें पूर्ण स्वातंत्र्य सर्वांस मिळालें पाहिजे.

**६ काम करण्याचा हक्क**. कोणतेंही काम करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे आणि त्याच्या कामाचा अेखाद्या व्यक्तीला किंवा गटाला किंवा समाजाला उपयोग असेल त्या मानाने त्याला जो मोबदला मिळेल, त्यावरही त्याचा हक्क आहे. त्याला जरूर तर समाजाकडून पगारी काम मिळालें पाहिजे, आणि आपल्याला कोणत्या प्रकारचें काम जास्त चांगलें करतां येअील हें सांगण्याचा त्याला हक्क आहे. आपण उत्पन्न केलेल्या मालाचा किंवा केलेल्या कामाचा

उपयोग असेल त्या मानाने मोबदला मिळण्याचा त्याला हक्क आहे. विशिष्ट प्रकारच्या मालाकडे लक्ष वेधल्याबद्दल, किंवा ज्यांना तो अरवीं मिळाला नसता त्यांना तो पुरवल्याबद्दल, त्याला मोबदला मिळाला पाहिजे, कारण हें उपयुक्त काम आहे. परंतु केवळ अेखादी वस्तु विकत घेऊन, कांहीं वेळ ठेवून, नंतर केवळ नफ्याकरतां विकणें मात्र कायदेशीर नाहीं. हा नुसता सट्टा आहे, त्याचा कोणालाही उपयोग नाहीं. लोकांच्या अडचणींतून असे लोक फायदा काढतात, आणि अडचण उत्पन्न केल्यामुळें किंवा कायम ठेवल्यामुळेच हा फायदा होतो. हें समाजहितास विघातक आहे, आणि हें खाजगी व्यक्तींनीं किंवा सार्वजनिक संस्थांनी किंवा कार्यकारी मंडळांनींही करणें बेकायदा होआील.

**७ खाजगी मालमत्तेवर हक्क.** कायदेशीर रीतीनें मिळवलेल्या मालमत्तेचा पाहिजे तसा उपभोग घेण्याचा प्रत्येकाचा हक्क आहे आणि त्यांत कोणाही खाजगी व्यक्तींनी किंवा सार्वजनिक मंडळांनी व्यत्यय आणूं नये अेतदर्थ त्याला समाजाने संरक्षण दिलें पाहिजे.

**८ हालचालींचें स्वातंत्र्य.** कोणताही मनुष्य स्वतःच्या खर्चानें जगभर पाहिजे तेथें जाऊं शकेल. परंतु एखाद्याच्या रहायच्या जागेंत व भोंवतालच्या मर्यादित आवारांत कोणीही त्याच्या संमतीशिवाय किंवा कायदेशीर हुकुमाशिवाय जाऊं शकणार नाही. परंतु जोंपर्यंत मनुष्य कोणाच्याही खाजगी आवारांत शिरत नाही, दुसऱ्याच्या मालाची खराबी करीत नाही, किंवा दुसऱ्याच्या मालमत्तेच्या उपयोगांत त्याला अडचण करीत नाही, तोंपर्यंत त्याला जमिनीवरून, पाण्यांतून किंवा हवेंतून, कोणत्याही देशावरून, डोंगरावरून, नदीवरून किंवा समुद्रांतून, जगांत पाहिजे तेथें जाण्याचा हक्क आहे. कारण हें जग सर्वांचें आहे.

**९ वैयक्तिक स्वातंत्र्य.** अेखाद्या मनुष्याचें डोकें बिघडलेलें असल्यामुळे त्यापासून अितरांना धोका आहे असें कायदेशीर तज्ञांनीं ठरवलेलें नसल्यास ( आणि ठरवलें असल्यास तें सात दिवसांनी पुनः निश्चित केलें पाहिजे आणि नंतर निदान अेकअेका वर्षाने तरी त्याचा फेरविचार झाला पाहिजे ) कोणाही

मनुष्याला विशिष्ट गुन्ह्याचा आरोप ठेवल्याशिवाय २४ तासांचे वर कैदेंत ठेवत येणार नाही, नंतर त्याच्या संमतीशिवाय ८ दिवसांचे वर चौकशीकरतां अटकेंत ठेवतां येणार नाही, व चौकशीशिवाय तीन महिन्यापेक्षां जास्त कैदेंत ठेवतां येणार नाही. त्याच्यावर खटला चालण्यापूर्वी कांही दिवस त्याच्या विरुद्ध काय पुरावा असेल त्याची अेक प्रत त्याला मिळाली पाहिजे. तीन महिनेपर्यंत त्यावर खटला चालून त्याला कायद्यानें शिक्षा झाली नसल्यास त्याला दोषमुक्त करून सोडून दिलें जाअील. अेकाच गुन्ह्याबद्दल कोणावरही दोनदां खटला चालूं शकणार नाहीं. टीका करण्याची मुभा सर्वांना असली तरी कोणाला अिजा होअील किंवा मानसिक त्रास होईल अशा विपर्यस्त टीकेपासून सर्वांना संरक्षण मिळालें पाहिजे. गुप्त पुरावा बेकायदा आहे. सरकारी दप्तरांत अेखाद्या मनुष्याविरुद्ध लिहून ठेवलेल्या गोष्टींवरून कोणाच्याही वैयक्तिक स्वातंत्र्याला धक्का बसतां नये. दप्तरांतील लेख सरकारच्या उपयोगाकरतां असतात. त्याचा कोणाविरुद्ध कोर्टांत पुरावा म्हणून उपयोग होणार नाही.

१० **अत्याचारापासून संरक्षण.** कोणाच्याही संमतीशिवाय त्याच्या शरीराचा कोणताही भाग कापतां येणार नाही. अेखादा मनुष्य स्वतः दांडगाअी करीत नसेल, तर त्याच्याशीं कोणीही दांडगाअीचें वर्तन करतां नये, किंवा त्याला मारतां नये आणि कोणत्याही रीतीने त्याचे हाल करतां नये, त्याला मानसिक त्रास देतां नये, व ढेंकूण पिसवा असलेल्या किंवा कोणत्याही प्रकारें आरोग्यास विघातक असलेल्या जागेंत कोंडून ( तुरुंगांत ) ठेवतां नये किंवा ज्यांच्या अंगावर उवा वगैरे असतील किंवा ज्यांच्यापासून कोणताही संसर्ग होण्याचा संभव असेल, अशांबरोबर तुरुंगांत ठेवतां नये. तो स्वतः सांसर्गिक स्थितींत असेल किंवा त्याच्यापासून अितरांच्या आरोग्यास कोणताही धोका असेल, तर त्याला जबरदस्तीने स्वच्छ व जंतुरहित केला जाअील किंवा अितरांपासून दूर ठेवला जाअील. कोणासही दुसऱ्यामार्फत, अप्रत्यक्ष रीतीने–म्हणजे निकटसंबंधीयांस गिरफ्तार करून किंवा त्रास देऊन–शिक्षा केली जाऊं नये.

**११ कायदे करण्याचा हक्क.** वर सांगितलेले हक्क जन्मसिद्ध हक्क आहेत आणि ते कोणासही काढून घेतां येणार नाहीत. या हक्कांवर समाजाच्या सोयीकरतां कांही मामुली बाबतींत निर्बंध घालावे लागतील, उदा० रस्त्यांत गाड्या अमुक बाजूने हांकाव्या, खोटीं नाणीं पाडण्यास बंदी, किंवा शहरांत किंवा इतरत्र घरें अमुक प्रकारची बांधावीं, वगैरे सुव्यवस्थेच्या किंवा आरोग्याच्या दृष्टीने केलेले नियम. परंतु अितर कोणताही कायदा बंधनकारक होण्यास तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बहुमताने पास झालेला असला पाहिजे. कायदे करणें किंवा त्या कायद्यांचा अर्थ करून अंमलबजावणी करणें, या गोष्टींबद्दल लोकनियुक्त प्रतिनिधि जबाबदार राहतील. कोणत्याही सांकेतिक किंवा सार्वजनिक कार्याच्या बाबतींत बहुमताचाच अंमल चालेल. कोणत्याही कायद्याची चर्चा करून तो बदलतां येअील किंवा रद्द करतां येअील. कोणत्याही गटाच्या नांवानें कोणताही गुप्त करार किंवा तह करतां येणार नाही.

स्वतंत्र जगांत कायदे करण्याचा हक्क सर्व जनतेला आहे, आणि जसजशा नवीन पिढ्या उत्पन्न होतात तसतसा हा हक्क त्यांनाही प्राप्त होत असल्यामुळे कोणत्याही पिढीला पुढच्या पिढ्यांचा हा हक्क अंशतः किंवा पूर्णतः नाहीसा करतां येणार नाही.

हे सर्व मनुष्यांचे हक्क आहेत, तुमचे हक्क आहेत. हा हक्कांचा करारनामा तुमच्या राजकीय नेत्यांना आणि राज्यकर्त्यांना मान्य करायला आणि अंमलांत आणायला सांगा. ते अैकणार नाहींत, किंवा शब्दच्छल करूं पाहतील, तर त्यांना नवीन जगांत जागा नाही.

---

# आड वाटेने

लेखक, स. हृदय, महाड.

“ विनू ! डाक्टरांनी सांगितलं, त्याला टायफॉअिड झालाय ! ” घाअीने विनोबांच्या खोलींत येऊन विजयाने जाहीर केलें. विनोबांची पत्नी अर्ध्या तासा-

पूर्वीं शाळेंत गेलेली पाहून विजया आली होती.

" कळलंय मला. फार वाईट गोष्ट ! "

" आतां ? " तिनें विचारलें.

" धीर धरायला हवाय ! " ते कांहीतरी बोलायचें म्हणून बोलून गेले.

विजयाची भीति खरी ठरली. तिचा पति टायफॉअिडला बळी पडला. महिन्याकांठी त्याला मिळणाऱ्या अेकशेंविसांच्या अभावीं तीन मुलांचा संसार पार पाडण्याची जबाबदारी तिच्या शिरावर येऊन पडली.

विनोबांपुढेंही माठा पेंच पडला होता. विजया त्यांना कदाचित् कांही सांकडें घालील हें ते ओळखून होते. पण ते मुद्दामच मूग गिळून स्वस्थ राहिले होते.

लोकाचारासाठी विजयाने दीड महिना कसातरी काढला. अेके दिवशीं विनोबांकडे येऊन ती हंसत हंसत त्यांच्याकडे बघत राहिली.

त्यापूर्वीची थोडीशी हकीकत सांगतों. विनोबांचें कुटुंब मुंबअीच्या म्युनिसिपल शाळेंत नोकरीवर होतें. त्यांचें लग्न झालें तरी त्यांनी आपली नोकरी सोडली नव्हती. शिवाय विनोबाही कमी कमाअी करीत नसत. पूर्वीं नाटक कंपन्यांतून गाण्याच्या साथीचीं कामें करून आज ते प्रवीण सारंगिये म्हणून चांगलेच नांवाजलेले होते. त्यामुळें अनेक गाण्याच्या जलशांचीं त्यांना बोलावणीं येत, बिदागीही भरपूर मिळे.

विजयाचे पति शंकरराव नुकतेच चाळींत राहण्यास आले होते. ते विजयाच्या सर्व थाटापुढे मुंबईच्या रामासारखे दिसत. त्यामुळें त्या मजल्यावरील सर्वांचें लक्ष प्रथम त्यांचेकडे वेधलें. कळलें की विजया ही त्यांच्या दुसऱ्या लग्नाची बायको होती.

अेके दिवशीं नळावर पाणी भरीत असतां विजयेने विनोबांशीं भांडण केलें. तिच्या त्या अफाटपणाने विनोबा चुपचाप राहिले. त्यांना आश्चर्यच वाटलें ! आपल्या पत्नीचा कांहीअेक अपराध नसतां नाटक्या विनोबानें तिच्याशीं भांडण केल्याचें वृत्त शंकररावांना कळलें. त्यांना तो अपमान वाटला. त्यांनी विनोबांशीं न बोलण्याचा निश्चय केला आणि त्यांनी तो मरेपर्यंत पाळला.

पण त्या भांडणाच्या तिसऱ्या दिवशींची गोष्ट. विनोबा अेकटेच नळावर पाठमोरे उभे पाहून विजया तेथे गेली. "क्षमा करा हां! मी परवां उगीचच भांडलें तुमच्याशीं."

"उगीचच!" विनोबांना आश्चर्य वाटलें. "कां?" त्यांनीं दुसऱ्या क्षणींच विचारलें.

"सांगेन मी केव्हांतरी." विजया निघून गेली. तिचा तो कावेबाजपणा विनोबांना समजून चुकला.

अशीं नऊदहा वर्षे गेलीं होतीं. विनोबांची पूर्वींइतकीच प्रसिद्धि आणि प्राप्ती होती. शंकररावांचा अबोला तसाच चालू होता त्यांच्याशीं...त्यांची पत्नी नित्यनियमाने शाळेंत जाअी. तिचा पगारही वाढला होता. आणि विजयाला मात्र तीन मुलें झालीं होतीं.

"आतां परिस्थिति बदलली, विजू, कसं समजत नाही तुला हें?" तिच्या हंसण्याचा अर्थ जाणून विनोबांनी उत्तर दिलें.

"आतां कायमची मनोव्यथा गेली. कसलीच टोंचणी नको लागायला, ......तुझीच, सर्वस्वी तुझीच नाही का आतां मी?"

"तें खरं, पण कायदा आणि निसर्ग यांचा मेळ बसणार नाही ना? शंकरराव होते तोंवर जमून गेलं सारं त्यांच्या नांवावर."

"आतांही जमून जाअील. माझ्यावर सोंपीव तें."

"पण तें कसं?"

"अरविंद, तारा, निशा, हीं तिन्ही राजबिंडीं मुलं तुझींच आहेत विनू."

"छट्! शक्य तरी आहे का?"

"मी दोनतीनदां बोललें होतें तुझ्याशीं. तीं त्यांचीं असूं तरी शकतील का?"

"पण त्यांत कांहीं अर्थ असणं शक्य नाही हें मला पुरेपूर माहीत होतं."

"जग म्हणतं, मुलं आअीच्या तोंडवळणी आहेत, त्यावरून..."

"त्यावरून नाहीं."

" तुला मुलं झालीं नाहीत म्हणून ? "

" छट् ! त्यावरूनही नाही. " विनोबा अेकदम बोलले.

" मग मी मूर्ख आहें असं तर तुला वाटत नाही ? " विजया हंसली. " अैक विनू, तो मला आवडत नव्हता हें त्याला माहीत होतं. तरीपण त्याला जरासुद्धां संशय येअुं नये म्हणून मी जपलें. त्याचा माझ्यावर विश्वास बसावा म्हणून त्याचं खाणंपिणं नीट पाहिलं मी. अगदीच सक्ती होअुं लागली की माझा नाअिलाज होअी. कायदेशीर बायको होतें ना मी त्याची ? मी टोपी वापरायला शिकलें. चांगल्या जाणत्या तज्ञाचा सल्ला घेतला होता मी. त्यामुळें अप्रिय माणसाचीं मुलं संभाळण्याचा घोर प्रसंग माझ्यावर आला नाही, समजलं ? त्याची रखेली म्हणून वागलें मी अितके दिवस. आतां तुझी पत्नी म्हणून हं ! " असें म्हणून ती लाडिकपणानें हंसली.

" अस्सं ! " अितकें बोलून विनोबांनी अेक दीर्घ श्वास सोडला.

" भीति का वाटली तुला, विनू ? "

" नाही, तसं कांही नाही ", विनोबा कचरत बोलले.

" मी दहा वर्षांपूर्वीच पूर्ण विचाराने वागलें. तुझ्यावर कांहीअेक जबाबदारी पडणार नाही. अैक. त्याचे कांही पैसे बँकेंत आहेत, माझे दागिने मी सर्वच्या सर्व पर्वांच विकले. मी नर्सिंग शिकणार आहें. फक्त मी तुझीच रहावी म्हणून तुझं संरक्षण मात्र पाहिजे आहे मला. मनाने मी विधवा नाही, पण लौकिकाने आहें. येत्या पहिलीपासून मी तुझ्या शेजारची रिकामी खोली भाड्यानं घेणार आहें. तुझं नांव न लावूं शकणारीं आपलीं मुलें हीं आपलीं आहेत, या समाधानाने जगण्यांत मला आनंद वाटतोय, विनू. "

विनोबाला हायसें वाटलें. विजयेच्या कर्तबगारीचा आणि निग्रहाचा अभिमान वाटला त्याला.

" विजू, तूं जवळ येणार ? जास्त जपायला हवं आपल्याला. "

" त्याची नको काळजी तुला. नळावर मी मधूनमधून तुझ्याशीं कडाडून भांडेन, हं ! "

विजया-विनोबा मनापासून हंसलीं.

---

# रशियांतील घटस्फोट

रशियांतील क्रांतीनंतर कित्येक वर्षेंपर्यंत घटस्फोट अत्यंत सोपा केलेला होता, यामुळे नीतिबाजांत खळबळ उडून रशियाचा अधःपात झाला अशी ओरड झाली होती. तथापि त्यामुळें रशियाचें कांही नुकसान झालेलें दिसत नाही. तेथील जन्ममान कमी झालें नाही आणि चालू युद्धांत त्यांनींच सर्वांत अधिक चिकाटी दाखविली आहे. तथापि रशिया देखील थोडाबहुत नीतिबाजी-कडे कलत आहे असा पुरावा यापूर्वींच दिसला आहे. घटस्फोटाचे बाबतींतलाही कायदा बदलून आतां पूर्वींप्रमाणें केवळ मनांत आल्याबरोबर घटस्फोट न मिळतां त्याकरतां कोर्टांत जावें लागतें, यामुळें नीतिबाजांस समाधान होत आहे. तरीसुद्धां तेथील कायदा अजूनही बराच समंजस आहे असें दिसतें. आतां घटस्फोटाचा अर्ज करण्यापूर्वी वर्तमानपत्रांत जाहिरात द्यावी लागते. अशा तऱ्हेनें जाहिरात दिल्यानंतर अेक तीस वर्षांच्या पुढच्या वयाची स्त्री कोर्टांत आली. कित्येक वर्षांपासून तिला व नवऱ्याला आपलें पटत नाही असें वाटल्या-वरून तीं वेगळीं रहात होतीं. तिला एक मूल होतें आणि ती त्याला वाढवण्यास समर्थ असल्यामुळे तिने पोटगीची याचना केली नाही. त्यांनी विभक्त झालेलेंच बरें, असें मत पंचांनीही दिलें होतें. नवरा कोर्टांत हजर होता आणि त्याला हें सगळें कबूल होतें. तेथील सरकारी वकील म्हणजे अेक हंसतमुख साठ वर्षांची बाअी होती, आणि तिला या जोडप्याबद्दल सहानुभूति वाटत होती. कोर्टांत लोकांना येण्याची बंदी नव्हती, परंतु तेथून जातांना अेकदोन माणसें सहज आंत डोकावलीं अितकेंच. त्या बाअीला घटस्फोट मिळाला, पण तो फार

सहज मिळाला असें लोकांना वाटूं नये म्हणून त्याकरितां कोर्टानें तिला दहा आठवड्यांच्या पगाराइतकी फी द्यायला लावली. ती तिने दिली आणि आपल्या माजी नवऱ्याबरोबर गप्पा मारीत ती निघून गेली. ज्या परदेशी वार्ताहराने ही हकीकत लिहिली, त्याचें मत अतिशय चांगलें झालें. नाहीतर अिंग्लंडांत किंवा अमेरिकेंत पाहिलें तर कोर्टांत अेकमेकांवर नाना तऱ्हेचे आरोप करणारीं जोडपीं आणि ती गंमत पहायला जमणारे प्रेक्षक पाहून किळस येतो. पण हल्ली जरी रशियांतील स्थिति अितर देशापेक्षां बरी आहे आणि जबर फीपलीकडे घट-स्फोटाला अडचण नाही, तरी ही स्थिति अशीच टिकेल की इतर नीतिबाज देशांच्या ओळीला रशिया येऊन बसेल, अशी भीति वाटायला बरीच जागा आहे. कारण असल्या बाबतींत तेथे पूर्वी असलेलें स्वातंत्र्य कमी कमी होत आहे असें दिसतें.

---

# गणित आणि संगीत

गणित हा विषय पुष्कळांना येत नाही, त्यामुळे ज्यांना तो येतो त्यांना दुसरें कांहीच येत नाही असें भासवण्याचा प्रयत्न पुष्कळ लोक करीत असतात. उदाहरणार्थ संगीत सौभद्राच्या १९३० सालच्या आवृत्तींत उपोद्घात म्हणून श्री. त्र्यंबक नारायण साठे या विद्वानांचा लेख छापला आहे, त्यांत ' पूर्वपीठिका व आख्यायिका ' दिल्या आहेत. त्यांत अेके ठिकाणीं लिहिलें आहे की " सौभद्र नाटक रा. ब. केरुनाना छत्रे–डेक्कन कालेजांतील गणिताचे प्रोफेसर–यांस नजर केलें आहे. गणिती विद्वानास संगीत नाटक पुस्तक नजर करणें हें जरा चम-त्कारिक वाटेल, कारण गणितशास्त्री हे बहुतेक संगीतकलेविषयी अरसिक असावयाचे, असा त्या कालाचाच नव्हे तर आतांपर्यंतचाही बहुतेक तोच अनु-भव आहे. परंतु या समजुतीस फक्त केरुनाना हेच अपवाद होत. ' हें लिहिणारे गृहस्थ मामलेदार, मॅजिस्ट्रेट वगैरे होते, अडाणी नव्हते.

पण याउलट मानसशास्त्रावरील प्रख्यात लेखक 'विल्यम मॅकडूगल, अेफ्. आर्. अेस्.' हे आपल्या 'द अेनर्जीज ऑफ मेन' या ग्रंथांत म्हणतात, (पृ. १६६), 'संगीतज्ञाला संगीतापासून होणाऱ्या आनंदाचा, आाण गणितज्ञानाला गणितांतील एखादा सुंदर सिद्धांत सिद्ध केलेला वाचून होणाऱ्या आनंदाचा पाया सारखाच असतो; आणि गणित आणि संगीत हीं दोन्ही पुष्कळ वेळां अेकाच व्यक्तींत अेकवटलेलीं कां सापडतात, याचा उलगडा अंशतः तरी यामुळे होतो.' आतां या मानसशास्त्रज्ञाचें मत खरें की वरील मामलेदारांचें मत खरें, हें वाचकांनीच ठरवावें. आमचा विषय गणित असल्यामुळे आम्ही अधिक कांही लिहीत नाही.

---

# ग्रंथपरीक्षण

१ 'नवीन हिंदु कायद्याचें समाजशास्त्रदृष्ट्या परीक्षण,' लेखिका, डॉ. अिरावती कर्वे, आर्यभूषण मुद्रणालय, पुणें—४. पृष्ठें १२.

पुण्याच्या दैनिक ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेले लेख या लहानशा चोपड्यांत पुनर्मुद्रित केलेले आहेत. लेखिकेने हिंदु–कायदा–समितीपुढें साक्ष दिली होती आणि त्यांतल्या कांही मुद्यांबद्दल पसरलेले गैरसमज दूर करण्याच्या उद्देशाने हे लेख लिहिले आहेत, असें लेखिकेने आरंभी लिहिलें आहे. या गैरसमजांचें मुख्य कारण म्हणजे लेखिकेचें म्हणणें समजून घेण्याची पुष्कळांची अिच्छाच नव्हती. विचार केल्यास लेखिकेने उपस्थित केलेले मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेत आणि हा कायदा अंमलांत आल्याने बरेच अनर्थ आणि बऱ्याच लोकांवर जुलूम होण्याचा संभव आहे हें लक्षांत येअील. पहिला मुद्दा असा की वेगवेगळ्या प्रांतांतल्या हिंदु समाजांत आज वेगवेगळ्या चालीरीती अंमलांत आहेत आणि त्या या नवीन कायद्याशीं जुळत नाहीत. सतीसारखी अेखादी दुष्ट चाल असेल तर ती कायद्याने बंद करणें जरूर आहे आणि निकडीचें आहे, याबद्दल दुमत होणार नाही. पण ज्या चालीपासून कोणतेही दुष्परिणाम झाल्याचें दिसत नाही, त्या जुलमाने बंद करण्याचा किंवा बदलण्याचा कोणत्याही सरकारला काय अधि-

कार पोंचतो ? हिंदु समाज नांवाला श्रुतिस्मृतिप्रणीत धर्म मानतो खरा, पण खरें पाहूं गेलें तर रूढ धर्म प्रत्येक प्रांतांत वेगळा आहे. या सर्व लोकांना अेका कायद्याखाली आणण्यांत कोणाचें हित आहे ? आणि जर कोणाचेंच फारसें हित नसेल तर या अेकीकरणांत हांशील काय ? नवीन कायद्यांत विवाहाचा विचार करतांना आते-मामेभावंडांचीं लग्नें बेकायदा ठरवलीं आहेत, पण अशीं लग्नें पुष्कळ जातींत रूढ आहेत आणि त्यांपासून कांही नुकसान आहे असें सिद्ध झालेलें नाही. नवीन कायद्यांत यांतून पळवाट ठेविली आहे, ती अशी की ज्या जमातींत अशीं लग्नें करायची परंपरा आहे, त्या जमातींना अपवाद म्हणून अशा लग्नांची परवानगी असावी. म्हणजे सुमारें निम्या हिंदूना हा अपवाद लागू होतो. अशा स्थितींत त्याला अपवाद कां म्हणावें ? निम्या हिंदूंना वेगळा कायदा करून सर्व हिंदूंचा कायदा अेक म्हणण्याचें हें ढोंग कां ? कित्येक ठिकाणीं मामा-भाचीचीं लग्नें चालू आहेत. त्यांचा मात्र अपवाद मानलेला नाही. असें कां ? समितीला तसें वाटतें, यापेक्षा याला कारण नाही. लग्न करणारीं माणसें अेकाच वर्णाचीं असावीं व सगोत्र नसावीं असा नियम करून, नंतर लगेच असें लग्न झाल्यास तें अेवढ्याच मुद्यांवरून बेकायदा ठरणार नाहीं, असें सांगितलें आहे. हा काय आचरटपणा आहे ? कायदा करून लगेच तो मोडला तरीही चालेल असें सांगणारी ही समिति शुद्धीवर होती काय ?

विशेष महत्वाचा मुद्दा म्हणजे ख्रिस्ती धर्मांतून उसनें घेतलेलें सक्तीच्या अेकेरी विवाहाचें कलम, म्हणजे लग्न करतांना पूर्वीची पत्नी किंवा पति जिवंत असतां नये, अशी सक्ती नवीन कायद्यांत आहे. याविषयींचीं डॉ. अिरावती कर्वे यांचीं मतें आमच्या वाचकांस माहीतच आहेत. विशेषतः घटस्फोटाची योग्य व्यवस्था केल्यास कोणत्याही स्त्रीला सवतीबरोबर राहण्याचें कारण राहणार नाही, यावर त्यांनीं भर दिला आहे आणि तो आमचे मतें बरोबर आहे. पण हल्लीं कांही विलायती डोक्याच्या हिंदूंना सक्तीचें अेकपत्नीव्रत पाहिजे आहे, त्यांना हे मुद्दे समजत नाहींत. वारसा, दत्तक, वगैरेसंबंधीही त्यांचे विचार समंजस आहेत. त्यांचा वाचकांनी अवश्य विचार करावा. सं.

---

# पत्रव्यवहार

१ हस्तमैथुनाने गर्मी, परमा किंवा अितर रोग होतात काय? २. अिंद्रियाचा पुढील भाग मोठा झाला आहे, तो पूर्ववत् करण्यास काय केलें पाहिजे? ३ अिंद्रियाचे पुढील त्वचेच्या आंत पिंवळसर घट्ट पदार्थ सांचतो. तो काय आहे व कां साचतो? ४ हस्तमैथुनामुळें वीर्य पिंवळें होऊं शकतें काय? मधून मधून लघ्वी पिंवळी होण्याचें कारण काय? ५ सांचणारा पदार्थ साचूं नये म्हणून काय केलें पाहिजे? **अेक तरुण.**

**उ.** १ गर्मी व परमा हे सांसर्गिक रोग आहेत. त्यांचे जंतु असतात व रोग झालेल्या मनुष्याचा प्रत्यक्ष स्पर्श किंवा त्याने वापरलेल्या कपड्याचा किंवा इतर पदार्थाचा स्पर्श झाल्याशिवाय हे रोग होत नाहींत. हस्तमैथुनाने प्रकृतीवर परिणाम होईल, पण सांसर्गिक रोग होणार नाहीत. २. संवय सोडून दिली पाहिजे. ३ व ५ हा पदार्थ स्वभावतःच तेथील त्वचेंतून येत असतो. तो रोग नाही व दररोज साबणाने धुतल्यास तो सांचत नाही, न धुतल्यास सांचून त्याला घाण येते. ४. वीर्य पिंवळें होत नाही. लघ्वीचा रंग प्रकृतिमानाने बदलतो. **सं.**

---

# शारदेचें पत्र

येथे 'धनुर्धारी' नांवाचें अेक साप्ताहिक आहे हें तुला कदाचित् माहीत असेल. त्याने ७ अेप्रिलच्या अंकांत अेका 'प्रतिनिधी'चा लेख प्रसिद्ध करून येथल्या साहित्यसंघाच्या कार्यकर्त्यांना शिव्या दिल्या आहेत, म्हणजे अगदीं शिमग्यांतल्या शिव्या नव्हेत, पण शिव्याच त्या. तो म्हणतो, 'ज्या लोकांना वाङ्मयाबद्दल तितकीशी आस्था नाही, वाङ्मयांत कांही तरी करून दाखवावें अशी ज्यांना हिंमत नाही, वाङ्मयाभिरुचीची वाढ व्हावी अशी ज्यांना तळमळ नाही, अशा लोकांची साहित्यसंघाच्या कार्यकर्त्यांत गर्दी झाल्यामुळेच असा सांवळा

गोंधळ माजत असतो.' हे कार्यकर्ते सभासदांनी निवडून दिलेले असतात अशी माझी समजूत आहे. सभासदांना जर ते पसंत नसतील तर ते त्यांना पुनः पुनः निवडून कां देतात ? हल्लीचे चिटणीस कित्येक वर्षे काम करीत आहेत असें मी अैकतें. बहुधा या प्रतिनिधीसारख्या वाङ्मयभक्तांना वाङ्मयाचें काम अितकें असतें की त्यांना चिटणीसांचें काम करायला फुरसत होत नसावी, तेव्हां ज्यांना वाङ्मयाची तळमळ तितकी नाही, त्यांच्या अंगावर अशी कामें पडलीं तर त्यांत बिघडलें काय ? की जीं कामें स्वतः करण्याची या प्रतिनिधीसारख्यांना हिंमत नाही, तीं लोकांनी केलेलीही त्यांना पाहवत नाहीत ?

आणि हें सगळें कशावरून ? तर न्यायमूर्ति गजेंद्रगडकरांचा सत्कार करण्याची टूम निघाली म्हणून. वास्तविक असे सत्कार पूर्वीही झालेले आहेत, तेव्हां त्यांत नवीन कांहीच नाही. ते निदान संघाचे तहाहयात सभासद आहेत असें दिसतें, पण यापूर्वी सभासद नसलेल्या लोकांना तांतडीने सभासद करून घेऊन त्यांचे सत्कार केलेले आहेत ! हा ' प्रतिनिधि ' म्हणतो काय ? तर आजपर्यंत संघानें जितके सत्कार करायला पाहिजे होते तितके केले नाहीत, उदाहरणार्थ काणेकर बडोद्याच्या संमेलनाचे अध्यक्ष झाले, प्रो. भट आणि श्री.वकील यांच्या नाटकांना सांगलीला बक्षिसें मिळालीं ( सांगलीला म्हणे अितकीं उत्तम नाटकें आलीं होतीं की कोणाला बक्षिस द्यावें हें त्यांना न कळल्यामुळें त्यांनीं अेकाअैवजीं तीन नाटकांना बक्षिसें दिलीं ! ) तेव्हां त्यांचा सत्कार केला नाही. पण आजपर्यंत संघाने कांही चुका केल्या म्हणून तशा नेहमीच करीत जावें हा कोठला न्याय ?

पण त्याचा मुख्य भर आहे तो भोजनाविरुद्ध. तो म्हणतो पाहिजे तर सत्कार करा, पण त्यांत भोजन कशाला पाहिजे ? 'सरस्वतीभक्तांनी' भोजनाविरुद्ध कितीहि ओरड केली ( भोजनासारखी शारीरिक गोष्ट अशी सार्वजनिक रीतीनें करूं नये असेंही कांहींचें मत असल्याचें मी अैकतें ), तरी बाकीच्या जगाचेंही मत या बाबतींत विचारांत घेतलें पाहिजे. भोजनाशीं कांहीं अेक संबंध नसलेल्या संस्था देखील असे समारंभ घडवून आणीत असतात. उदाहरणार्थ

लंडनमधें 'रॅशनॅलिस्ट प्रेस ॲसोसिअेशन' नांवाची जी बुद्धिप्रामाण्यवादी संस्था आहे, आणि जिच्या सभासदांत अत्यंत उच्च दर्जाचे जगमान्य साहित्यिक आणि तत्ववेत्ते आहेत, त्या संस्थेचें देखील अेक वार्षिक भोजन होत असतें. अशा भोजनांत सुग्रास अन्न खाण्यापलीकडे कांही उद्देश असतो, हें सांगून तरी या प्रतिनिधीला कळेल असें मला वाटत नाही. कारण तो वर्णन करतो तें असें कीं प्रभाकर पाध्यांसारख्या थोर गृहस्थांनीं ह्याला विरोध केला असतांही 'भोजनाला चटावलेल्या या लोकांनी, संघाच्या सर्व सभासदांना या समारंभांत भाग घेतां येणार नाही हें माहीत असूनही, पाणारलेल्या जिव्हेने भोजनसमारंभाचें समर्थन केलें.' शिव्या देण्याच्या भरांत या प्रतिनिधीची तर्कबुद्धि जर थोडीतरी शिल्लक असती, तर त्याला निदान अितकें तरी कळलें असतें की या पाणारलेल्या जिव्हेच्या लोकांना तेच पदार्थ घरीं कमी खर्चात मिळाले असते. मग जास्त खर्च करून ते जे समारंभ घडवून आणतात, तें काय केवळ 'पैसे फेकण्याची' अिच्छा होते म्हणून ? धनुर्धारीचे प्रतिनिधि अितके बेअकली कसे ? त्यांतली भविष्यें वाचणारांना फारशी अक्कल नसते हें खरें, पण अितर वाचकांनाही नसते काय ?

त्याच्या म्हणण्यांत जो काय थोडा युक्तिवाद आहे, तोही अगदीच फोल आहे. या भोजनांना दोनअडीच रुपये वर्गणी पडते आणि ती सर्वांनाच देतां येत नाही, म्हणून ज्यांना देतां येत असेल त्यांनीही मनाचें औदार्य दाखवून भोजनें करूं नये, आणि कायद्याने संख्या ४९ पर्यंतच ठरवली आहे हा आणखीं अेक मुद्दा. म्हणे आपल्याला जो खर्च करतां येत नाही तो करून अितरांनी समारंभ केला तर गरीब सभासदांच्या भावना दुखावतात, आणि ज्यांना येण्याची अिच्छा असेल त्या सर्वांना कायद्यामुळें येतां येत नाहीं, तेव्हां असे सभारंभ न करण्याचें औदार्य सभासदांनी दाखवावें. मला वाटतें गरीब लोकांनी थोडा विचार करायला शिकावें. जगांत कांही गोष्टी आहेत, त्या गृहीत धरूनच चालावें लागतें. समता आज अस्तित्वांत नाही, तेव्हां कृत्रिम समता करण्याकरितां ज्यांच्याजवळ पैसे असतील त्यांनी ते खर्च करूं नये, सर्वांना मोटरींतून

जातां येत नाही म्हणून मोटर असलेल्यांनीही ती वापरूं नये, कांही लोकांना पोटभर जेवायला मिळत नाही म्हणून कोणीहि पोटभर जेवूं नये, हें औदार्य नव्हे, मूर्खपणा आहे. संघाची वर्गणी दोन रुपये आहे, ती देखील सर्वांना सहज देतां येईल असें नाही, आणि विशिष्ट प्रसंगांकरतां वेगळी वर्गणी घेण्याची सर्व संस्थांची पद्धत आहे. कित्येकांना ती देतां येत नाही हें उघडच आहे, म्हणून तसे समारंभ करूं नये म्हणण्यांत काय अर्थ आहे? मी म्हणतें या प्रतिनिधीलाच औदार्य नाही. स्वतःला बसायला मोटर नाही म्हणून अितरांना मोटरींत बसलेले पाहून त्याच्या जिवाची तडफड होत असावी. समजा समतेचें तत्व अगदी सर्वमान्य झालें तरी सर्वांना मोटरी मिळणें शक्य नाही म्हणून कोणालाच असूं नयेत असें मी तरी म्हणणार नाही. असल्या बेअकली सूचनांकडे समंजस सभासद तरी लक्ष देणार नाहीत.

आणखी अेक बेअकली लेख १५ अेप्रिलच्या ' नवयुग ' मध्यें छापला आहे. रशियाने अेक गाढवपणा केला म्हणून तसा सर्वांनीच केला पाहिजे, अशा प्रचाराला कांग्रेसपक्षाच्या ' नवयुग ' मध्यें तरी स्थान मिळणार नाही असें मला वाटत होतें. कदाचित् अत्रे आजारी असल्यामुळे हें झालें असावें, किंवा गांधी-शाही लवकरच सुरू होईल आणि त्यावेळीं असला बेअकली प्रचार कांग्रेसला उपयोगी पडेल असेंही कदाचित् अत्र्यांना वाटलें असेल. याचा लेखक 'धन्वंतरी' म्हणतो काय, तर ' रशियन रंगभूमि व नाटकें, रशियन लघुकथा, रशियन कादंबऱ्या, अित्यादि कलाकृतींच्या द्वारां प्रतिभावंतांच्या प्रतिभेचा प्रवाह जो वाहतो, तो अेका विशिष्ट पद्धतींत, विशिष्ट शिस्तींत व अेका तत्वप्रणालीला धरून वाहवला आहे. त्यामुळे साहित्यकारांत कोणी एकांडा शिलेदार नाही, आणि यदाकदाचित् जर कोणी निघाला तर त्याची दयामायाही केली जात नाही. अेकदम त्याच्या मुसक्या बांधल्या जातात. '

हें वर्णन बरोबर आहे, पण अशीच योजना आपल्यालाही पाहिजे असें म्हणणाराचा मेंदू शाबूत आहे की नाही याची शंका येते.

तुझी **शारदा**